**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.११/०८/२०२६

***सर्व नागरिकांनी "हर घर तिरंगा" या मोहिमेत सहभागी होण्याचे महानगरपालिकेचे आवाहन***

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून सन २०२२ पासून "हर घर तिरंगा" ही मोहीम सुरु करण्यात आली आहे. लोकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरुकता वाढविणे हा या मोहिमेचा मूळ उद्देश आहे. सन २०२६ मध्ये सुद्धा "हर घर तिरंगा" ही मोहीम मोठ्या उत्साहात राबविणेत येत आहे.

यानुषंगाने सन २०२६ मध्ये "हर घर तिरंगा" मोहीम केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे दि. ०९ ऑगट ते १७ ऑगट २०२६ या कालावधीमध्ये राबविण्याचे नियोजन राज्य शासनामार्फत करण्यात आले आहे. यावेळी 'वंदे मातरम्' गीताला १५० वर्षे पूर्ण होत असल्याने यावर्षीच्या अभियानाची संकल्पना 'वंदे मातरम्' गीताच्या १५० वर्षाच्या स्मरणाशी जोडण्यात आलेली आहे. तसेच दि.१४ ऑगस्ट २०२६ रोजी "फाळणी भयावहता स्मृती दिन" देशभरात विविध स्मरण व जनजागृतीपर उपक्रमांद्वारे पाळण्यात येणार आहे. या कालावधीत शासन निर्देशानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व शाळा व महाविद्यालयांना या अभियानांतर्गत विविध उपक्रम आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अभियानांतर्गत शाळा, महाविद्यालयांमध्ये 'वंदे मातरम्' चे सामूहिक गायन, तिरंगा प्रदर्शन, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम, निबंध लेखन, चित्रकला, रांगोळी स्पर्धा वक्तृत्व व घोषवाक्य इ. स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. या शिवाय महानगरपालिकेमार्फत तिरंगा रॅली, बाईक रॅली, प्रभातफेरी, रांगोळी यांसारखे उपक्रमही आयोजित करण्यात येणार असून विविध ठिकाणी तिरंगा सजावट व रोषणाई करण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत सर्व नागरिकांनी दि.१३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत भारताचा तिरंगा ध्वज आपल्या घरावर, इमारतींवर, आस्थापनांवर फडकवावा असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे. तसेच "Selfie with Tiranga" या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभाग घेऊन तिरंग्यासोबत सेल्फी घेऊन www.harghartiranga.com या संकेतस्थळावर (website) त्यांचे सेल्फीज/फोटो अपलोड करावेत व संकेतस्थळावर सेल्फीज/फोटो अपलोड झाल्यानंतर मोहिमेत सहभागी झाल्याबाबतचे प्राप्त होणारे प्रमाणपत्र #HarGharTiranga, #Har Ghar Tiranga2026 या टॅगसह शेअर करावे असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

नागरिकांनी ध्वज फडकविताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. कोणत्याही प्रकारे जाणते-अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होणार नाही याबाबत सर्व नागरीकांनी आपले स्तरावर दक्षता घ्यावी. www.harghartiranga.com यावर Flag Hoisting Guidelines या सदराखाली राष्ट्रध्वज कसा फडकवावा याबाबतचे व्हिडीओ (videos) उपलब्ध आहेत.

"हर घर तिरंगा" या राष्ट्रभक्तीने प्रेरित अभियानात सर्व नागरिकांनी सहभागी होऊन आपले देशाविषयीचे, तिरंग्याविषयीचे प्रेम अभिव्यक्त करावे असेही आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.